# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 48/2023 दिनांक : 31.01.2023

## 1)मो. सा. चोरी :–

**1)देगलुर :–** दिनांक 28.01.2023 रोजी चे 15.30 ते 18.15 वा. चे दरम्यान, **शिवाजीपार्क देगलुर समोरून ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा सीबी शाईन कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/बीपी–4503 किमंती 40,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गरीबउल्ला करीमुल्ला खान, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. होट्टल बेस देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 52/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कणकवळे, मो. क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 11.02.2021 रोजी चे 10.00 ते दि.30.01.2023 चे 17.00 वा. चे दरम्यान, **उल्हासनगर नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या माहेरहुन व्यापार करण्यासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 32 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 43/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/81 बंडेवार, मो.क्रं. 7719982022** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 27.12.2022 रोजी चे 15.00 ते दि .30.01.2023 चे 11.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी मदीना मस्जीद जवळ देगलुर ता. देगलुर ह. मु. मगदुमनगर नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला स्वयपाक येत नाही, माहेरचे लोक भिकारी आहेत, लग्न थाटामाटात केले नाही असे घालुन पाडुन बोलुन उपाशी पोटी ठेवुन तुझ्या माहेरहुन बांधकामासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 29/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/आर एस घुगे, मो.क्रं. 9822720567** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)लिंबगाव :–**दिनांक 29.01.2023 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **निळाशिवार निळा ते चिखली जाणारी शिवपांदन रस्त्यावर माधव नरोजी जोगदंड यांच्या शेता जवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी मागील भांडणाचे कारणावरून गैरकायदयाची मंडळी जमवुन हातात लाठया, काठया व लोखंडी रॉड घेवुन दहशत निर्माण करून पाण्याने खराब झालेला रस्ता दुरूस्ती करत आहोत आणि तु येथुन बैल घेवुन का जातोस असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ केली फिर्यादी व साक्षीदाराचे जवळ येवुन यांचा तर काटा काढुत असे म्हणुन त्याच्या हातातील रॉडने लाटया काठयाने मारून हाडे मोडुन गंभीर दुखापत केली व मुक्कामार मारून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी रामकिशन पि. धोंडीबा जोगदंड, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. निळा ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरन 17/2023 कलम 326, 325, 324, 323, 143, 147, 149, 148, 149, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/दामोदर, मो. नं. 9823971641** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :–**दिनांक 29.01.2023 रोजी चे 14.30 ते 15.00 वा. चे दरम्यान, **निळाशिवार ता जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी मागील भांडणाचे कारणावरून गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व त्याचे भाऊ व मुलगा असे आपल्या शेतातील उस कारखान्यावर जाणार असल्याने पाण्याने खराब झालेला रस्ता जेसीबीच्या साहयाने दुरूस्त करून रस्त्यात पाईप टाकुन जाण्यास योग्य करीत असतांना फिर्यादी व साक्षीदार यांचे कामात अडथळा करून कत्तीने /काठयाने हातावर बोटावर, कानावर डोक्यात मारून जखमी केले व हाताचे बोट फॅक्चर केले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी माधव नरोजी जोगदंड, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. निळा ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरन 16/2023 कलम 325, 324, 323, 143, 147, 148, 149, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/दामोदर, मो. नं. 9823971641** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**1)इतवारा :–** दिनांक 30.01.2023 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **नावीद पान शॉपवर बरकत कॉम्पलेक्स जाणारे सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशीररीत्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2150/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1210, अफजलखान महेमुदखान पठाण,. ने. स्थागुशा** दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 33/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2543 चाऊस, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 30.01.2023 रोजी चे 13.10 वा. चे सुमारास, **क्रांतीनगर वाय पॉईट नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू किंमती 2660/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/भुषण पि. बालासाहेब कांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 30/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/डी एस मुंडे, मो.नं. 7972644803** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 30.01.2023 रोजी चे 18.25 वा. चे सुमारास, **सन्मान प्रेस्टीज जवळील मोकळया जागेत नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 2400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/3332, प्रदिप जयराम भद्रे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 26/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2444, मो.नं. 9823467191** हे करीत आहेत.

**3)हदगांव :–** दिनांक 30.01.2023 रोजी चे 13.45 वा. चे सुमारास, **बसस्थानक समोरील हॉटेल सहाराचे समोर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी/विदेशी दारू किंमती 1600/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री जगन गणपती पवार, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 52/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ हंबर्डे, मो.नं. 9284422052** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 49/2022 दिनांक : 31.01 .2023

कंटेनर चोरटयास सोनखेड पोलीसांनी केले गजाआड....

दिनांक 30.01.2023 रोजी पोलीस स्टेशन मुखेड येथुन नियंत्रण कक्ष नांदेड यांना माहिती देण्यात आली की, पोलीस स्टेशन नायगांव हद्दीतील रातोळी पुलावर कंटेनर क्रमांक डिएनबी–09/यु–9153 अडवुन सदर कंटेनर चालकास मारहाण करून चालकाचे हात पाय बांधुन त्यास पोलीस स्टेशन मुखेड हद्दीतील शिखारा या गावांचे हद्दीत टाकुन देवुन सदर चालकाचे ताब्यातील कंटेनर सात चोरटयांनी जबरदस्तीने पळवुन नेले असे माहितीवरून पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड यांच्याकडुन नांदेड जिहयातील पोलीस स्टेशन व रात्रगस्त अधिकारी व अंमलदार यांना सतर्क राहुन आपापले पोस्टे हद्दीतील रोडवर पेट्रोलींग करून सदरचा कंटेनर मिळुन आल्यास त्यातील चोरटयांना व कंटेनर ताब्यात घेण्या बाबत सुचना देण्यात आल्या.

पोलीस स्टेशन सोनखेड येथील रात्रगस्त पोलीस अंमलदार पोकॉ/1471 रमेश वाघमारे, व सोबत पोलीस जीप चालक पोकॉ/778 अतुल नागरगोजे यांनी रात्रगस्त दरम्यान पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड यांच्या अदेशान्वये पोलीस स्टेशन प्रभारी श्री विशाल भोसले, सपोनि यांनी तात्काळ रात्रगस्त अंमलदार यांना वरील प्रमाणे सुचना देवुन रवाना केले. सदर अंमलदार यांनी सतर्क राहुन प्रॉपर सोनखेड अंतर्गत नांदेड ते लोहा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 361 वर पाळत ठेवुन सतर्क असतांना सदर क्रमांकाचा कंटेनर हा भरधाव वेगात लातुरच्या दिशेने जात असल्याने सदर पोलीस अंमलदार यांनी जिवाची पर्वा न करता जिव धोक्यात घालुन सदरचा कंटेनर समोर शिताफीने शासकीय जिप लावुन कंटेनर थांबला असता आतील 05 चोरटे हे कंटेनर थांबताच पळुन गेले, इतर पाच चोरटे सोनखेड परिसरात पळुन गेल्याने पोस्टे सानेखेडचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदर चोटयांचा पाठलाग करून एका चोरटयास नामे गंगाधर बळीराम सलकमवाड, वय 28 वर्षे, रा. डेरला ता. लोहा यास पकडले. त्याचेकडे सखोल चौकशी केली असतां त्याने त्यांचे साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली दिली. सदर आरोपी व कंटेनर पोलीस स्टेशन नायगांव यांच्या ताब्यात देवुन उत्कृष्ट कामगीरी केली आहे.

सदरची कामगरी **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री आबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री डॉ. सिध्देश्वर भोरे**, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा यांचे मार्गदर्शनाखाली **श्री विशाल भोसले**, सपोनि, पोकॉ/1471 **रमेश वाघमारे**, जीप चालक पोकॉ/778 **अतुल नागरगोजे** यांनी केलेली आहे. वरिष्ठांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड